आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 • वर्ष ८ वे • अंक १६८ वा • मंगळवार दि. ०३ डिसेंबर २०२४ • किंमत २ रूपया • पाने ४ •





## झरोका

एक – अहो, मागीतलेले खाते मिळेलच असे नाही, कारण नको त्या विषया संदर्भात आव आणून ताक मागायचे पंरतू कांगावा दुधाचा करायचा हे बरोबर नाही. अजित पवार नसते तर शिवसेनेच्या जागा जास्त वाढल्या असत्या असा स्पष्ट इशारा शिवसेना नेते आ. गुलाबराव पाटील यांनी लगावल्यामूळे महायुतीत हे काय घडते आहे हेच कळत नाही, डोकं बधीर झालं आहे.

दुसरा – अरे, विचार तत्वाचे काय घेवून बसलास इथं फक्त सत्तेसाठी झुंज असते, मागतले काय आणि दुध ताकाचे काय घेवून बसलास, कोणतं ही खात असलं तरी त्यातून खत मिळतच असतो, त्यामूळे ही धडपड असते. कशाला उणीदूणी काढतोस.

एक – अहो, नरेंद्र मोदी यांच्या सांगण्यावरुन देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होत आहेत, पंरतू काम चलावू मुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंद हे मुख्यमंत्री पद नाही तर गृह खाते तरी द्या म्हण–तात, तो त्यांचा हक्क आहे, पंरतू अजित पवार यांनी मला हे पाहिजे, ते पाहिजे याची धडपड का करावी वास्तवात भाजपाला कोणाचीच गरज नसताना केवळ शिंदे यांच्या मूळेच भाजपा महायुतीला यश मिळाले म्हणून एकनाथ शिंदे यांचा लाड करत असले तर अजित पवार यांनी का उड्या माराव्यात हेच कळत नाही, म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, दगाबाज शिंदे सेना आणि राष्ट्रवादीच्या अजित पवार यांच्या मुळे भाजपाला जिवंतपणा आला. पुर्ण पाच वर्षाचा काळ ठाकरे सरकार असते तर आज भाजपाची आजघडीला जशी महाविकास आघाडीची स्थिती झाली आहे, तशीच अवस्था भाजपाची झाली असती त्यामूळे शिंदे सेनेचे नेते म्हणून गुलाबराव पाटील यांनी अजित पवार यांना कशाला खिजवावे अशी कुजबूज लोकात होते आहे. कारण शिंदे–पवार हे दगाबाज भ्रष्ट नेते आहेत, हे लोकांना कळलेले आहे, त्यामूळे शिंदे बाजू भक्कम करण्यासाठी अजित पवार यांना डंख मारुण भाजपाचे तूणतुणे कशाला वाजवावे हे लोक बोलत असल्यामूळे तूझी बडबड थांबव असे वाटते.

एक – अहो, ही माझी बडबड नाही, फडणवीस, शिंदे, पवार यांच्याशी कांही देणे घेणे नाही, मागीतलेले मिळतेच असे नाही, ताकाचीच आशा असताना दुधाची मागणी कशाला करावी म्हणून अजित पवारांना गुलाबराव पाटील यांनी खिजविले महणून बोलतोयं.

दुसरा – अरे, सुप्रसिध्द अभिनेते निळू फुले यांनी सकाराम बाईंडर मध्ये राजकारण गेले खड्ड्यात असे म्हटले होते, तेच वास्तव आजघडीला दिसते आहे. तू कशाला नाक खूप–सतोस.

राष्ट्रीयस्तरावर राज्या, राज्यातील असंतूस्ट प्रादेशिक पक्षांना महायुतीत घेवून त्यांचे अस्तित्व संपुष्टात आणने हेच भाजपाची भूक ठरावी कारण सत्तेचे गाजर दाखवून त्यांना जवळ करायचे आणि हळूहळू पंगू करुन त्यांना सोडून द्यायचे मग सारेच प्रादेशिक पक्ष घर का ना घाटका, धोबी का कुत्ता, बावरा अशीच अवस्था प्रादेशिक पक्षाची होत असते, हेच गणित महायुतीत सहभागी होणाऱ्या फुटीर प्रादेशिक पक्ष नेत्यांना कसे काय कळत नसावे याचे आश्चर्य वाटते.

**काय बोलता राव !**

अरे, प्रादेशिक पक्ष नेत्याना केवळ सत्त–ेची आस असते. त्यामूळे राजकीय मुल्य किंवा सामाजीक भान सोडून देवून केवळ सत्तेसाठी ते महायुतीत जात असतात. त्याचेच उदाहरण महाराष्ट्राचे देता येईल. केंद्र सरकार मध्ये आणि महाराष्ट्राच्या सत्तेत सहभागी झालेले कॉग्रेस, राष्ट्रवादी कॉग्रेसचे नेते भ्रष्ट आहेत, हे सांगण्याची गरज नाही, त्यामूळे स्वतःला स्वच्छ करण्यासाठी ते भाजपाचा आसरा घेतात, आणि काळं झालेलं तोंड आरशात पाहून स्वच्छ पांढरं झाल्याचा आव आणून सत्ताकारण करीत असतात, म्हणूनच गेले दहा दिवस झाले महाराष्ट्रात सरकार बनू शकत नाही, कारण काळं की पांढरे यातला फरकच त्यांना कळत नसल्यामूळे तू तू मै मै करीत आजचे राजकारण सापसीडीचा खेळ बनले आहे, त्यातून भाजपाला केवळ प्रादेशिक पक्षाना कसे झुलवून संपूष्टात आणायचे हीच त्यांची भूक ठरावी कारण सभ्य वर्तणातल्या एकनाथ शिंदे यानां घोटाळेबाज अजित पवार यांना हे कसे कळत नसावे हेच कळत नाही. याचे आश्चर्य वाटते, मग राजकीय समिक्षकानी प्रसार माध्यमानी अशाना कोणता शहाणपना शिकवावा हे अनुत्तरीतच राहाते मग बोला दाजीबा !

# लातूरच्या गंजगोलाईचे काय ?

लातूर (दैलाप्रप्र) : लातूरचा भौगोलीक विचार करता गंजगोलाई हे लातूर शहराचा आत्मा आहे, याच आत्म्याला कायदा व सुव्यवस्थेचे वावडे कसे हा प्रश्न सर्वसामान्य जनतेला भेडसावणारा दिसतो आहे, गंजगोलाईच्या आवतीभोवती मुख्य बाजार पेठा आहेत, सर्वसामान्य जनतेची वर्दळ असते. जनतेच्या सोईसुवीधासाठी गंजगोलाई परिसरात पोलीस चौकी आहे, चोही बाजूने नागरी पोलीस आणि वाहातूक पोलीस तैणात असतात. पंरतू त्यांना कांही रहदारीचे देणे घेणे नसावे असेच चित्र दिसते आहे.



गंजगोलाईतून शहरा मध्ये ये–जा करण्यासाठी छोटे मोठे रस्ते असले तरी, बस स्थानक, सुभाष चौक, मज्जीत रोड, आंबेडकर चौक, गुळ मार्केट आणि भुसार लाईन कडे जाणारे रस्त्यावर अधिक गर्दी असते. त्यात अवैद्य प्रवाशी वाहतूक करणारे अटोरिक्षा चालक हे नियमाचे उलंघन करुन चौपदरी रस्ता व्यापून टाकतात, त्यामूळे इतर वाहानासह प्रवाशांना ये–जा करण्यासाठी रस्ताच नसतो, वाहतूक पोलीस आणि नागरी सुविधा सांभाळणारे पोलीस यांच्यात तारतंम्य नसल्याने ॲटो चालकांचा हैदोश होत असताना दिसतो आहे. त्यामूळे कायदा व सुव्यवस्था गंजगोलाई परिसरात आहे की नाही, त्यात देखील पोलीस यंत्रणा काय करते आहे, याची शाहनीशा पोलीस अधिक्षक सोमय मुंडे करतील काय, आणि सर्वसामान्य जनतेला रहदारी साठी सहकार्य करतील की नाही,अशीच विचारपूस होत असून लातूरच्या गंजगोलाईचे काय, कायदा व सुव्यवस्थेचा वाली कोण, अशीच लोकप्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

# जागतिक एड्स दिन २०२४ निमित्त आयोजित रॅलीद्वारे एड्स, एचआयव्हीबाबत जनजागृती

लातूर, (जिमाका) : जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्यावतीने जागतिक एड्स दिनानिमित्त लातूर शहरामध्ये २ डिसेंबर, २०२४ रोजी एचआयव्ही, एड्स जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथून रॅलीला सुरुवात झाली.




विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी वैद्यकीय अधिक्षक डॉ. सचिन जाधव, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस.एन. तांबारे, एआरटी नोडल ऑफिसर डॉ. चंद्रकांत रायभोगे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीधर पाठक, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, सुक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. वर्षा कलशेटी तसेच आरोग्य विभाग व इतर विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य 'टेक द राईट्स पाथ'चा नारा देवून जनजागरण रॅलीची सुरुवात झाली. मिनी मार्केट , हनुमान चौक, गुळ मार्केट, गांधी चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर रॅलीचा समारोप झाला. यावेळी आयसीटसी १ चे समुपादेशक राहूल दोशी यांनी आभार मानले.

रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी एचआयव्ही ससर्ग टाळण्यासाठी युवक तरुणांमध्ये जबाबदार लैंगिक वर्तवूणक व सुरक्षित लैंगिक संबंध, एचआयव्ही संसर्गाचा प्रतिबंध, सर्व एचआयव्ही संसर्गितांना औषधोपचार, ट्रीट ऑल पॉलिसी, नवीन एचआयव्ही ससर्ग होवू द्यायचा नाही. कलंक व भेदभाव होवू द्यायचा नाही. एड्सने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण शुन्यावर आणणे याबात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थितांना एड्सविरोधी शपथ देण्यात आली.

रॅलीमध्ये न्यू व्हिजन नर्सींग स्कुल, इंदिरा गांधी नर्सींग कॉलेज, शासकीय नर्सींग कॉलेज, वेदांत नर्सींग कॉलेज, महाराष्ट्र कॉलेज ऑफ नर्सींग, जिजामाता नर्सींग स्कूल, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नर्सींग कॉलेज, अरमान नर्सींग कॉलेज, एमआयएमएस नर्सींग कॉलेज, स्वामी विवेकानंद नर्सींग कॉलेज, रेनसन्स नर्सींग कॉलेज, विजय नर्सींग कॉलेज, प्रयागबाई पाटील नर्सींग कॉलेज, सोनी नर्सींग कॉलेज, जवळगे नर्सींग कॉलेज, शारदा नर्सींग कॉलेज, लातूर शहर वाहतूक नियंत्रण शाखा, टीआय प्रकल्प, विहान प्रकल्प, १०८ एम.ई.एम. एस. टीएमसह रुग्णवाहिका तसेच शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास दुरुगकर यांनी केले.

या रॅलीच्या यशस्वीतेसाठी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक जिल्हा कार्यक्रम अधिकारी बिपीन बोर्डे, , जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय व सर्व अधिकारी , कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# माता रमा आंबेडकर स्त्री रुग्णालयच्या नविन रुग्णवाहिचे लोकार्पण

लातूर : लातूर जिल्हा रुग्णालयाच्या अंतर्गत शाहू चौक येथील माता रमाई आंबेडकर स्त्री रुग्णालयात रुग्णवाहीका नाविन्यपूर्ण सुविधानी आलेल्या रुग्णवाहीकेचे लोकार्पण स्त्री रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. रविंद्र भालेराव यांच्या हस्ते फित कापून लोकार्पण करण्यात आले.



माता रमाई स्त्री रुग्णालयात आजवर अपुऱ्या सुविधा होत्या, पुर्वीच्या कांही जुन्या रुग्णवाहीका आहेत पंरतू डॉ. भालेराव यांच्या प्रयत्नातून स्त्री रुग्णालयाला नविन रुग्ण वाहिका मिळाल्यामूळे महिला रोग निदान आणि प्रस्तुती रुग्णासाठी सोयीसुविधा आणि रुग्णाला उपचारासाठी वाहतूक करण्यासाठी सुलभता निर्माण झाल्याचे दिसते आहे, त्यामूळे सर्वसामान्य जनतेकडून स्त्री रुग्णालयाच्या वैद्यकीय स्टाफचे आभार माणले जाते आहे, ॲम्बुलन्स संपर्कसाठी १०८ व गरोदर महिलासाठी १०४ या नंबरवर कॉल केल्यास रुग्णवाहीका उपलब्ध होवू शकते असे ही डॉ. भालेराव यांनी सांगीतले. नविन ॲम्युबलन्सचे पुजन येथील उपस्थित जेष्ट परिचारीका नर्सच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. भालेराव यांच्यासह इतर वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, कम्पॉडर आदी उपस्थित होते. लातूरच्या पूर्वभागात गोरगरीब बहूजन समाज राहात असल्यामूळे पूर्वभागातील महिला रुग्णांची आरोग्य सुविधा न्यायीक पध्दतीने होईल अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

## घरटी

घरटी बांधण्याची शिकवली नाही कोणी कला,
रक्तातच उपजत गुण होता, अनुभव मोठा भला.
वयात आलेल्या नर–मादीने प्रेमसंबंध जोडले,
अंड्यांना उब देण्यासाठी घरटे बांधले.
घरट्यात नर आणि मादीने संसार थाटला,
कालांतराने अंड्यांतून पिलांनी जन्म घेतला.
जन्मदात्यांनी पिलांना चोचीने चारा भरविला,
निस्वार्थ सेवेचा त्यांनी मार्ग दाखविला.
माय–पित्याच्या देखरेखीखाली पिलं मोठी झाली,
पंखात बळ मिळताच घरट्यातून भरारी मारली.
कष्टातून बांधलेली घरटी बिचारी निराधार झाली,
घरट्याला आधार दिलेली फांदीही गळून पडली.
बळीराजा घाम गाळुनी धान्य पिकवतो,
पृथ्वीवरील सर्व सजीव धान्य खाऊन तृप्त होतो.
निसर्गातील पशुपक्षी स्वच्छंदी आनंदाने जगतो,
जगण्यात स्वार्थ त्यांच्यात कधीच नसतो.
नाही केला कधी धन–संपत्तीचा साठा,
स्वावलंबी जगण्यातच त्यांचा आनंद मोठा.
कधीच नाही जागेसाठी भांडणं केलं,
मिळेल ते खाऊन, मिळेल त्या फांदीवर राहिलं.
ऋतूनुसार हवामानही बदलत जातं,
पंखांमध्ये शरीर झाकून सर्व सहन करतं.
मार्गदर्शनाचं नाही कोणी यांचे गुरु,
अनुभवाच्या ज्ञानामृतातून तयार झाले महागुरु
देवळात जाऊन कधी नाही केली भक्ती,
कष्टातून शोधली त्यांनी खऱ्या जीवनाची युक्ती.
कधीच नाही कोणाकडे हात जोडून भीक मागितली,
निसर्गानेच त्यांच्या आयुष्याची भूक भागविली.
जाती–धर्माची कोणतीही बंधनं नाहीत त्यांना,
निसर्गाच्या सान्निध्यात मनसोक्त जीवन जगणं.
बांधू नका जाती–धर्माच्या फांदीवर मनुवादी व्यवस्थेचं घरटं,
मानवतेच्या फांदीवर बांधा नेहमी माणुसकीचं घरटं.
मानवतेच्या पिल्लांना पाजवा संस्कारांचं पाणी,
माणुसकीची फुलं उमलतील गुलाबा वाणी.
जीवन हे सुंदर पृथ्वीवरील प्रवासाची यात्रा आहे,
पृथ्वीच्या घरात क्षणभर भाडोत्री म्हणून आपण राहतो आहे.
मानवी ह्दयांत मनुवादी विचारांची घरटी कधी बांधू नका,
कर्मकांडाच्या अग्नीचा जीवनात उडेल भडका!

**देशमुख पी.आर.९९२११११९५५**

# लातूर जिल्हा पोलीस दलाच्या कवायत मैदानावर पार पडलेल्या २८ व्या लातूर पोलीस जिल्हा क्रीडा स्पर्धेचे शानदार समारोप

लातूर : पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या अंगी



खिलाडूवृत्ती जोपासली जावी तसेच त्यांच्यातील कलागुणांचा विकास व्हावा या संकल्पनेतून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे मार्गदर्शनात दिनांक २८ २९ व ३० नोव्हेंबर दरम्यान तीन दिवसीय जिल्हास्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा शनिवारी दिनांक ३० नोव्हेंबर रोजी बाभळगाव येथील पोलीस कवायत मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेसाठी पोलीस मुख्यालय, चाकूर उपविभाग, अहमदपूर उपविभाग, निलंगा उपविभाग अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्टेशनचे पोलीस खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य उपमाहानिरीक्षक अमीरूल हसन अन्सारी हे होते. यावेळी मार्गदर्शनपर भाषणात प्राचार्य तथा उपमहानिरीक्षक अमीरूल हसन अन्सारी यांनी ताणतणावमुक्त जीवनशैलीसाठी खेळांची आवड जोपासली पाहिजे, प्रत्येक पोलीस हा शारीरिक व मासिक दृष्ट्या मजबूत व कणखर असणे आवश्यक आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीमुळे पोलिसांचे त्यांचे समोरील आव्हाने व त्यांचे स्वरूप बदलले आहेत. पोलिसांनी त्यांचे कर्तव्य खिलाडी वृतीने, आव्हाने स्वीकारून पार पाडावे. आज इतर विभागापेक्षा पोलीस विभागावर मोठी जबाबदारी असल्याने प्रत्येक युनिफॉर्म मधील अधिकारी व कर्मचारी यांनी लोकशाही, शाशनाप्रती, जनतेप्रती एकनिष्ठ राहून कर्तव्य पार पाडावे असे सांगितले.

पोलीस मुख्यालय मैदानावर तीन दिवसात फूटबॉल, व्हॉलीबॉल, हँडबॉल, बास्केटबॉल, खो–खो, कब्बडी तसेच १००, २००, ४०० व ८०० मिटर धावणे, गोळाफेक, लांबउडी, भाला फेक, थाळी फेक, तायक्वांदो आदी स्पर्धा पार पडल्या. शनिवारी उर्वरित स्पर्धा घेऊन त्यानंतर समारोप कार्यक्रम घेण्यात आला. संगीत खुर्चीमध्ये पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणार्थी प्रतिज्ञा साळुंखे व भाग्यश्री चौधरी यांनी अनक्रमे प्रथम, द्वितीय क्रमांक मिळवला तर १०० मिटर धावण्याच्या स्पर्धेत महिला पोलीस अंमलदार अश्रि्वनी जाधव व पल्लवी चित्तलवाड यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय बक्षीस मिळवले. पुरुष पोलीस कर्मचाऱ्यांसाठी १०० मिटर धावण्याची स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये सागर जाधव यांनी प्रथम व प्रेमानंद कांबळे यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. या क्रीडा स्पर्धेत चाकूर अहमदपूर निलंगा उपविभाग व पोलीस मुख्यालय अशा एकूण

# अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यातील अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७३ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही.

त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्र्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला.

१९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी – अहिराणी – खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर – माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण – उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर……, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला……, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर…… धरित्रीले दंडवत….. यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत.

या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्र्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्र्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे.

जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७३ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# पाय कोठे आहेत ?

## संपादकीय...

केंद्र सरकारचा चालू आर्थीक वर्षाचा सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा दर निचांकी ठरला, तरी ही माझेच खरे आणि भारताची आर्थीक परिस्थिती जागतीकस्तरावर चांगली आहे, असे वाजवी भाष्य करुन पंतप्रधान नरेंद्र मोदीसह राज्या राज्यातील मुख्यमंत्री आपलीच रिओढत असताना दिसत आहेत. कारण आरोग्य, शिक्षण सर्वांगीण विकास यासाठीच्या योजना बाजूला ठेवून त्यावर कसलीही तरतूद न करता सत्ताधारी पक्ष हा केवळ सत्ता मिळविण्यासाठी नवे कांही तरी शोधून लाडक्या बहिन सारख्या योजनांना तरतूदीच्या पलिकडे जावून पैसा कोठून आणायचा आणि तो खर्च करायचा हे सर्वसामान्य जनतेच्या दरडोईवर कर्जाचे ओझे लादून सरकारी उपकार दाखवून महिलांना आपलसे करणे आणि सत्तापावर करुन घेणाऱ्या सत्ताधीशानी जे कांही सोंग घेतले आहे, त्यामुळे सर्वसामान्य जनतेचा विचार न करता इतराकडू कर्ज काढून जनतेच्या माथी मारायचे आणि न कळत पणे शासकीय योजना असे दाखवून जनतेचीच फासवूनूक करायची आणि त्यातून सत्ता हस्तगत करायची ही गीधाडी चाल न परवडणारी असल्यामूळे सत्ताधाऱ्यांचे पाय कोठे आहेत अशीच लोक प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

राजकारण हे असंतूष्ट आत्म्याचा सागर आहे, असे केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांचे उद्गार सत्य ठरावेत असेच वाटते, कारण महाराष्ट्रात जे कोणी सत्ताधीश आहेत, ते भ्रष्ट गुन्हेगार आहेत, त्याना पावन करुन घेवून भाजपाने सत्ता हस्तगत केली, तरी ही, हा वर्ग फक्त आपल्याच विचाराचे सरकार आले यातच खुष आहेत, कारण स्वतः कोण आहोत, काय पाप-पुन्य केले, किती भ्रष्टाचार केला, किती अन्याय अत्याचार केले, किती दापदडपशी केली, या सर्व बाबी बाजूला ठेवून आम्हीच जनतेचे कैवारी, न्यायीक कारभारी असे दाखून केवळ विविध महामंडळे, वेगवेगळ्या योजनासह केवळ निवडणूक डोळ्या समोर ठेवून लाडकी बहिण अवतरली, पंरतू लाडक्या बहिण्याच्या ओवाळनतील बोज्या हा सर्वसामान्य जनतेच्या मानगुडीवर बसला, त्याचे काय, म्हणून जमीनीवरचे पाय डोक्यावर ठेवून सत्ताकारण करणाऱ्या राजकीय व्यक्तीना कोणत्या माफात तोलावे हे कळेनासे झाल्यामूळे आम जनते मध्ये तिरस्कार झाल्याचे दिसते आहे.

भारतीय राजकारणाचा आणि सत्ताकारणाचा विचार करता उद्योगपती आणि भ्रष्ट राजकारणी याच्या सहमतीनेच सर्वसामान्य जनतेच्या जगण्याचा कोंडमारा होतो आहे, महागाई, भ्रष्टाराच्या भस्मासुराने जगणे कठीण केले आहे, तरी ही सर्वसामान्य जनतेच्या पदरात कांही पडत नसले तरी सत्ताधारी लोक हे केवळ भ्रष्ट लोकांना जवळ करुन लोकशाही आमच्या दारात रेंगाळते आहे असे भासवून हुकूमशाहीचा डांगोरा सत्तेच्या माध्यमातून सर्वसामान्य जतेच्या कांठळी बसेल असा रुबाब वाजवी पणे दाखवीत आहेत, याला काय म्हणावे हा सत्ताधाऱ्याचा भ्रष्ट शहाणपणा नाकाने कांदे सोलण्याचा असावा अशीच कुजबूज राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

उगाच विचारधारेचे सोंग घेवून राजकारणात वेगवेगळ्या विषयावर मत मंत्तातरे घडवून कांहीच न करता विकासाच्या गप्पा मारणे आणि सकल राष्ट्रीय उत्पन्न अर्थात जीडीपीचा दर वाढला असा कांगावा करायचा पंरतू आजघडीला चालू आर्थीक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत भारताचा राष्ट्रीय उत्पन्नचा दर निच्चांकी ठरला हे भारताचे प्रधान मंत्री नरेंद्र मोदी हे कोणत्या तोंडाने सांगतील याचीच वाट आम जनता पाहाताना दिसते आहे, त्यातच राजकीय वर्तूळासह अर्थ तज्ञात कमालीचे चिंताग्रस्त वातावरण निर्माण झाल्याचे दिसत आहे. आजघडीला महाराष्ट्राच्या सत्ताकारणात भ्रष्ट लोकप्रतिनिधीने जो कांही सत्तापदाचा नंगानाच सुरु केला आहे, ते कांही स्वच्छ चवदार, सुंगधी बासमती तांदूळ नाहीत, हे सर्व भ्रष्टानी डागाळलेले लोकप्रतिनिधी आहेत, आणि आमच्या दैनिक लातूर प्रभात मधून भ्रष्ट गुन्हेगार लोकप्रतिनिधीची नावे जाहिर करावीत असे नमूद केले होते, संशयावर ईडीचा भुंगा लावणारे केंद्र सरकारसह महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधीवर ईडाचा वापर का करीत नसावे ही बाब आर्श्चकारक वाटते कारण, भ्रष्टाचारी लोकप्रतिनिधीना पावन करुन घेवून सत्ता हस्तगत करणे हेच भाजपाचे एकमेव धोरण असावे की काय अशीच कुजबूज प्रसार माध्यमातून होताना दिसते आहे.

एकेकाळी भारतीय राजकारणात विकासाला आणि नागरी समस्यांना महत्व दिले जायचे, पंरतू आजघडीला गुंडागर्दी आणि भ्रष्ट विचाराला महत्व देवून तोच खरा लोकप्रतिनिधी ठरविणारी राजकीय पध्दत रुजली गेल्यामूळे सत्ताधाऱ्यांचे पाय जमीनीवर दिसत नाहीत, ते पाय कोठे आहेत, यांचा शोध ईडी ने घेतल्यास जनतेवर उपकार होतील असाच बोलबाला होताना दिसतो आहे.

# सावधान !भयावह रस्ते अपघात चिंताजनक

दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण कमी न येता वाढतच आहे. राज्यातील अनेक भागातुन आपल्याला दररोज एक-ना-एक भयावह अपघात झालेला दिसतो.असे अपघात होत आहे की ज्याची आपण कल्पनासुद्धा करू शकत नाही.अशाप्रकारचे अंगावर शहारे येणारे अपघात राज्यात कुठेना कुठे दिसुन येतात हे संपूर्ण अपघात मानवांच्या चुकांमुळे होत आहे.यावर नियंत्रण आणने काळाची गरज आहे.दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ ला सरस्वती विद्यालयातील विद्यार्थ्यांना बोर अभयारण्य येथे सहलीला घेऊन जाणारी खाजगी बस हिंगणी रोडवरील पेंढरी घाट परिसरात सकाळी ९.३० च्या सुमारास खायीत कोसळली यात एका विद्यार्थ्यानीचा मृत्यू झाला व अनेक गंभीर जखमी झालेत.याघटनेमुळे पालकांचे अश्रू आवरेना या भयावह दु:खद घटनेमुळे नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्र हळहळला.त्याच दिवशी २६ नोव्हेंबरला कामठी परिसरात वेगात आलेला ऑटो उभ्या क्रेनवर आदळल्याने दोन महिला प्रवासी जागीच ठार झाल्यात तर चालकासह सहा प्रवासी गंभीर जखमी झाले.दिनांक २६ नोव्हेंबरला कामठीतील गरूड चौक परिसरात सकाळी ५ वाजताच्या सुमारास आणखी भयावह घटना घडली भरधाव कार लोखंडी रेलिंगला धडकल्याने रेलिंग कारच्या आरपार घुसून युवकाचा मृत्यू झाला तर दोन अन्य जखमी झालेत.या संपूर्ण घटना ताज्या असतांनाच दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ ला गोंदिया जिल्ह्यातील डव्वाजवळ शिवशाही बस उलटून ११ प्रवासी ठार तर २९ गंभीर प्रवासी गंभीर जखमी झालेत. यावरून स्पष्ट होते की देशात किंवा राज्यात मोठ्या प्रमाणात उडानपुल, सिमेंट रोड, समृद्धी महामार्ग व अत्याधुनिक सुविधा असुनसुद्धा आपल्या डोळ्यासमोर गंभीर अपघात होतांना दिसतात. वाढत्या अपघातांचे मुख्य कारण म्हणजे वाहन चालकांच्या चुका किंवा वाहनांवरील नियंत्रण जाणे किंवा दुसऱ्याला वाचविण्यासाठी चुकीच्या मार्गांचा अवलंब केल्याने दुर्घटना होतांना दिसतात. गोंदियातील अपघात हा सडक अर्जुनी -गोंदिया मार्गावरून शिवशाही जात असतांना खजरी-डव्वा गावाजवळ दुचाकीला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात चालकांचे बसवरील नियंत्रण सुटले व बस उटली आणि मोठा घात झाला.म्हणजेच छोटीशी चूक जीवावर कशी बितते हे या अपघातांचे जिवंत उदाहरण आहे.याचप्रकारे बोर अभयारण्य येथे सहलीला घेऊन जाणारी खाजगी बस पेंढरी घाट परिसरात नागमोडी वळणावर बसचालकाचे नियंत्रण सुटले आणि मोठा घात झाला.हिट न्ड रन, वाहन चालवितांना मोबाईलवर बोलणे, रस्त्याचे खड्डे अशा अनेक कारणांमुळे वाहन चालकांचा जीव धोक्यात येतोच सोबतच पायदळ चालणारे किंवा इतर वाहनचालक किंवा त्या वाहनांमध्ये बसणाऱ्या प्रवाशांचा सुध्दा जीव धोक्यात येऊ शकतो याचे जिवंत उदाहरण आपणा सर्वांसमोर आहेच. खाजगी वाहन चालक आपला वेळ वाचवण्यासाठी किंवा जास्त ट्रीप व्हाव्यात या उद्देशाने वाहन अतिवेगाने चालवितात व अशा चुकांमुळे सुध्दा अपघात होतांना दिसतो.गोंदियातील शिवशाहीच्या अपघातामुळे शिवशाहीवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात (एसटी) सर्वाधिक अपघातांचे प्रमाण हे शिवशाहीचे आहे असे उघडकीस आले आहे.शिवशाही वाईट अवस्थेत असतांनाही महामंडळाकडून वातानुकूलितच्या नावाने सर्वाधिक प्रवासी भाडे आकारले जाते.गोंदिया जिल्ह्यात शिवशाही बसला झालेल्या अपघातामुळे शिवशाही बसच्या वाईट अवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.यावरून स्पष्ट होते की सध्याच्या परिस्थितीत शिवशाही बसचे मेंटेनन्स व्यवस्थीत नसल्याने अत्यंत खराब अवस्थेत असल्यामुळे प्रवाशांचे जीव धोक्यात येत आहे.राज्यात एसटी महामंडळाच्या ताफ्यात १५ हजार ६०० च्या जवळपास बसेस आहेत.त्यात ८९२ शिवशाही बसेसचा समावेश आहे.करोना काळात प्रवासी सेवा बंद पडल्यानंतर एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती वाईट झाली. तेव्हापासुन सातत्याने महामंडळात बसच्या सुट्या भागांच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे.त्यामुळे अनेक एसटी बसेस अपघातांचे सुध्दा कारण बनत आहे.या संपूर्ण बाबींवर सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.भारतात प्रत्येक तासाला ५३ रस्ते अपघात होतात;त्यात प्रत्येक तासाला १९ लोकांचा मृत्यू होतो असे एका अहवालात नमूद केले आहे. म्हणजे देशात किंवा राज्यात रस्ते अपघात कमी झाले नसुन वाढल्याचे दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे रस्त्याचे खड्डे, रोडचे बांधकाम, वाहनांचे ब्रेक बरोबर नसने,वाहन चालवितांना मोबाईलचा वापर, वाहनांचे मेंटेनन्स वेळोवेळी न करणे,मद्य पीवुन वाहन चालविणे अशा प्रकारच्या अनेक कारणांमुळे भयावह अपघातांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.त्यामुळे वाढते भयावह रस्ते अपघात पहाता वाहन चालकांनी वाहनावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.महाराष्ट्रासह देशात होणारे ८५ टक्के अपघात हे वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे किंवा चुकांमुळे होत असल्याचे दिसून येते,तर १५ टक्के अपघात हे प्रशासनाच्या चुकांमुळे होतांना दिसतात.एवढे माहीत असूनही वाहन चालक आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ असल्याचे दिसून येते.त्यामुळे कोणतेही वाहन चालवितांना काळजी पूर्वक वाहन चालवावे. कारण थोडीशी चुक मृत्यूचे कारण बनू शकते याला नाकारता येत नाही.त्यामुळे वाहन चालकांनो सावधान!आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवा व स्वतः सुरक्षित रहा व दुसऱ्यांना सुध्दा सुरक्षित ठेवा.जान है तो जहान हैहा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे व अपघात टाळले पाहिजे.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# लातूर- मुंबई सुपरफास्ट व बिदर -छत्रपती शिवाजी महाराज सुपर फास्ट एक्सप्रेस या रेल्वेगाडयांकरीता डब्यांची वाढ खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या पाठपुराव्यास यश



धाराशिव, लातूर, उदगीर परीसरातील नागरीकांची मागील अनेक वर्षापासूनची प्रलंबीत मागणी अखेर रेल्वे मंत्रालयाकडून मान्य करण्यात आली आहे. धाराशिव येथील रेल्वे प्रवाश्यांना तिकीट काढून देखील साधारणत: १० ते १५ दिवस प्रतीक्षा यादीमध्ये थांबावे लागत होते. यामुळे प्रवाश्यांची गैरसोय दुर होणार असून यापुढे नागरीकांना प्रतीक्षा यादीमध्ये थांबावे लागणार नाही. लातूर- छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस सुपर फास्ट (गाडी नं. २२१०७ व २२१०८) व बिदर-छत्रपती शिवाजी महाराज सुपर फास्ट एक्सप्रेस (गाडी नं. २२१४३ व २२१४४) या गाडयांना २- व ३- करीता वाढीव डब्यांची मागणी पुणे येथे दि. २८/०८/२०१९ दि. ०८/१०/२०२० दि. १३/०७/२०२१ दि. १५/१०/२०२३ रोजीच्या सोलापूर रेल्वे विभागाच्या झालेल्या बैठकी दरम्यान खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केली होती. या बैठकीस प्रामुख्याने श्री. ए. के. गुप्ता (महाप्रबंधक) मध्य रेल्वे यांच्याकडे केली होती व सातत्याने या विषयाचा पाठपुरावा केंद्रीय रेल्वे मंत्री मा.ना.श्री. अश्र्विनी वैष्णव यांच्याकडे केला होता. वरील दोन्ही रेल्वे गाडयांना अतिरीक्त डब्बे जोडले जाणार असल्याचे पत्र रेल्वे विभागाकडून प्रकाशित करण्यात आले आहे.

बिदर-छत्रपती शिवाजी महाराज सुपर फास्ट एक्सप्रेस (गाडी नं. २२१४३ व २२१४४) व लातूर- छत्रपती शिवाजी महाराज टर्मीनस सुपर फास्ट (गाडी नं. २२१०७ व २२१०८) या गाडयांना प्रवाश्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी रेल्वेच्या वाढीव २- व ३- डब्यांची मागणी लावून धरत लोकसभेच्या अधिवेशनादरम्यान विविध आयुधाच्या माध्यमातून आवाज उठविला होता. याचाच परीणाम म्हणून रेल्वे विभागाकडून दि.२१/११/२०२४ रोजीच्या पत्राव्दारे अतिरीक्त डब्बे दि. ०१/१२/२०२४ पासून जोडत असल्याचे जाहीर केले आहे.

धाराशिव व लातूर जिल्हयातील रेल्वे प्रवाश्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तसेच खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचे नागरीकांकडून अभिनंदन करण्यात आले आहे.

# महापालिकेच्या वतीने दंत चिकित्सा शिबिर संपन्न

लातूर/प्रतिनिधी: लातूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील गरजू रुग्णांना कमी दरामध्ये दर्जेदार दंत शल्य चिकित्सा सेवा उपलब्ध व्हावी, याकरिता राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान – लातूर मनपा आणि एम. आय. डी. एस. आर., लातूर यांच्या मध्ये दोन महिन्यापूर्वी सामंजस्य करार करण्यात आला आहे. या उपक्रमाची सुरुवात म्हणून महानगरपालिके अंतर्गत शहरातील दोन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी भव्य दंत शल्य चिकित्सा शिबिर आयोजन करण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक श्री बाबासाहेब मनोहरे यांनी आरोग्य विभागास दिले होते. या शिबिराचे उद्घाटन शहरातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र – गौतम नगर येथे लातूर महानगरपालिकेचे उपायुक्त(आरोग्य) डॉ. पंजाब खानसोळे यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांच्यासह एम. आय. डी. एस. आर. संस्थेमार्फत दंतशल्यचिकित्सा तज्ञ उपस्थित होते. याप्रसंगी, शहरातील नागरिकांनी महानगरपालिकेच्या आरोग्य संस्था अंतर्गत उपलब्ध करण्यात आलेल्या दंतशल्यचिकित्सा सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. या सेवेचा गरजू नागरिकांनी लाभ घेण्यासाठी देखील त्यांनी आवाहन केले.

या शिबिरामध्ये एकूण ११६ रुग्णांची दंत शल्यचिकित्सा करण्यात आली व उपचार करण्यात आले. संदर्भ सेवा आवश्यक असणाऱ्या रुग्णांवर पुढील तपासण्या करण्याकरिता संदर्भित केले आहे.

## स्वामी विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय बेस बॉल स्पर्धे साठी निवड झाल्याबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकरांच्याहस्ते सत्कार

लातूर : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक कल्याण सेवा संचालणालय महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा परिषद बारामती तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या १७ वर्षाच्या आतील मुले-मुली राज्यस्तरीय बेस बॉल क्रीडा स्पर्धेमध्ये दोघांची निवड झालेली आहे. यामध्ये १७ वर्षाच्या आतील मुले-मुलींच्या गटात यशराज काटे या विद्यार्थ्याची स्टँड बॉय म्हणून निवड झाली आहे तर १७ ते २९ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये दिल्ली येथे होणार्या मुलींच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी सिध्दी मेंगले या विद्यार्थिनीची निवड झाली असून या दोघांचाही जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्याहस्ते शाल व तुळशीचे रोप देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य गोविंद शिंदे, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, क्रीडा शिक्षक मुकेश बिराजदार, क्रीडा शिक्षिका निलांबरी हावळे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिव तथा माजी जि.प.अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, प्रशासकीय समन्वयक निळकंठराव पवार, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील, समन्वयक विनोद जाधव, समन्वयक बापूसाहेब गोरे यांच्यासह प्राचार्य शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांसह विद्यार्थ्यांनी कौतुक केले.

# राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेस प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



लातूर : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जिल्हा शाखा लातूर आणि दयानंद कला महाविद्यालय ( नाट्यशास्त्र विभाग ) लातूरच्या वतीने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सोमवारी लातूरच्या नाट्य रसिक प्रेक्षकांनी एकांकिकांना आपली उपस्थिती नोंदवून कलाकारांच्या अभिनयाला दाद दिली.

सोमवारी या स्पर्धेत लक्ष्मीमामा फाऊंडेशन, लातूरचे आंबेडकरीझम, दयानंद कला महाविद्यालय, लातूरचे कॅलिडोस्कोप, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शीचे राम मोहंमदसिंगआझाद, नाट्यमय, पुणे - हवेलीचे डोन्ट क्रीट , नाट्यआरंभ हवेली, पुणेचे शोषित , आर.आय.टी. इस्मालपूर, सांगलीचे व्हाय नॉट ?, मानवता बहुउद्देशीय संस्था, लातूरचे घुंगरू, श्री पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा चे सन्मानीय षंढांनो या एकांकिका सादर झाल्या. या एकांकिकातील सामाजिक आषयाने उपस्थित नाट्य रसिक प्रेक्षकांची मने जिंकली. लातूरच्या नाट्य रसिकांचा या एकांकिका स्पर्धेस अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे.

या एकांकिका स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी स्पर्धेचे निमंत्रक विक्रांत गोजमगुंडे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे लातूर जिल्हा अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर ( बाबा ), प्रमुख कार्यवाह धनंजय बेंबडे, उपाध्यक्ष अजय गोजमगुंडे, निलेश सराफ,कोषाध्यक्ष अमोल नानजकर , संघटक उमाकांत हुरदुडे, अविष्कार गोजमगुंडे, अनिल कांबळे, कल्याण वाघमारे, डॉ.अशोक आरदवाड, बाळकृष्ण धायगुडे, प्रदीप भोकरे, संजय अयाचित, अपर्णा गोवंडे, सुरेखा मदने, डॉ. भाग्यश्री कुलकर्णी, डॉ. मुकुंद भिसे, श्रुतिकांत ठाकूर, दीपरत्न निलंगेकर, एड. राणीताई स्वामी, सुधन्वा पत्की आदी मान्यवर परिश्रम घेत आहेत.

## श्री जय मल्हार खंडोबा देवस्थान,मोती नगर लातूर यात्रा माहोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

लातूर,प्रतिनिधी : प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी जय मल्हार खंडोबा देवस्थान मोती नगर,लातूर येथे खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन केले आहे. शनिवार दि. ७ डिसेंबर रोजी सौ.शुभांगी सचिन मजगे यांच्या हस्ते अभिषेक होणार आहे. दुपारी १ ते ४ पर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम,पालखी मिरवणुक सायं.५ वाजता व वाघ्या मुरळीचा कार्यक्रम होईल.



पहाटे ५ वा. लंगर तोडण्याचा कार्यक्रम व सौ.सुनिताताई नामदेवमामा चाळक यांच्या हस्ते संध्याकाळी ५ वा.पालीखीती आरती होणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष नामदेव मामा चाळक, अमितखंडेलवाल, उपाध्यक्ष मनोज झंवर,सचिन खंडेलवाल,गणेश गवारे,जयराम सुर्यवंशी,अनिल धुमाळ,आरूण सुर्यवंशी भैरवनाथ कदम,प्रमोद काळे आदींनी केले आहे.

## नटवर्य श्रीराम गोजमगुंडे हे कलेला पूर्णपणे वाहून घेतलेले व्यक्तिमत्व होते : सौ. दीपाताई क्षीरसागर

लातूर : नटवर्य श्रीराम गोजमगुंडे हे चित्रपट तसेच नाट्य कलेला पूर्णपणे वाहून घेतलेले महान व्यक्तिमत्व होते. आज त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, ही बाब मराठवाड्यातील कलाक्षेत्रासाठी अतिशय अभिमानस्पद असल्याचे प्रतिपादन बालरंगभूमी, मुंबईच्या उपाध्यक्षा सौ. दीपाताई क्षीरसागर यांनी केले.



अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद जिल्हा शाखा लातूर आणि दयानंद कला महाविद्यालय ( नाट्यशास्त्र विभाग ) लातूरच्या वतीने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे स्मृती करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे उदघाटन रविवारी सकाळी थाटात पार पडले. त्यावेळी त्या आपले मनोगत व्यक्त करत होत्या.

यावेळी प्रमुख अतिथी माउली ग्रुपचे चेअरमन सीए व्ही. पी. पाटील, पोलाद स्टील जालनाचे अध्यक्ष जयेश कांतीलाल मेहता, सुनील गुरव, बाळकृष्ण धायगुडे, श्रीमती भारती श्रीराम गोजमगुंडे, अ. भा. नाट्य परिषदेच्या लातूर शाखेचे अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनात दीपाताई क्षीरसागर पुढे म्हणाल्या की, श्रीराम गोजमगुंडे यांनी लातूरसारख्या ठिकाणी सांस्कृतिक चळवळ वाढवण्याचे काम अतिशय निष्ठेने केले आहे. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते निःस्पृह कार्य करत राहिले. चांगले कर्म कायम स्मरणात राहते, असे म्हटले जाते. अगदी तसेच कार्य श्रीराम गोजमगुंडे यांनी केले. ते बहुआयामी व्यक्तिमत्वाचे धनी , गुणवान अभिनेते होते. त्यांनी मराठवाड्यात सांस्कृतिक चळवळ, नाट्य चित्र सृष्टीला चालना देण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे. ऐतिहासिक, व्यावसायिक नाटकात, चित्रपटातही भूमिका केल्या. अशा ज्येष्ठ नटवर्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रतिवर्षी एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे, ही बाब अत्यंत सुखदायी असल्याचे क्षीरसागर यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय बेंबडे यांनी केले. ही स्पर्धा आज दिवंगत नटवर्य श्रीराम गोजमगुंडे यांच्या स्मृतिदिनी होत असून पुढच्या वर्षीपासून ही स्पर्धा श्रीराम गोजमगुंडे यांच्या जन्मदिनी म्हणजे, दि. २५ ऑगस्ट ला आयोजित करण्यात येईल असे सांगितले. यावेळी जयेश मेहता, व्ही.पी. पाटील यांनीही आपले विचार व्यक्त केले. शाहीर संतोष दामटे यांनी नटवर्य श्रीराम गोजमगुंडे यांच्या आठवणी विशद केल्या. यावेळी सर्वोत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार पटकावणारा अभिनेता रमण देवकर यांचा दीपाताई क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच लातूर शाखेचे अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून त्यांचाही सन्मान करण्यात आला.

एकांकिका स्पर्धेच्या पहिल्या दिवशी हैद्राबादच्या सोहं थिएटरचे प्रेम– अ –भंग, कथाकार नाट्यमंडळी, पुणेचे पेन सलामत, राशोर एंटरटेन्मेंट पुणे चे सुपारी, युगांक सांस्कृतिक व क्रीडा मंडळ, परंडाचे दृष्टी आणि द ड्रामाटाईसरचे वर्गणी या एकांकिकांनी प्रेक्षकांची मने जिंकली. या स्पर्धा दयानंद सभागृहात पार पडत आहेत.

नाट्य रसिकांनी या एकांकिका स्पर्धेचा अवश्य लाभ घ्यावा,असे आवाहन स्पर्धेचे निमंत्रक विक्रांत गोजमगुंडे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे लातूर जिल्हा अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर ( बाबा ), प्रमुख कार्यवाह धनंजय बेंबडे, उपाध्यक्ष अजय गोजमगुंडे, निलेश सराफ,कोषाध्यक्ष अमोल नानजकर , संघटक उमाकांत हुरदुडे, अविष्कार गोजमगुंडे, अनिल कांबळे, कल्याण वाघमारे, डॉ.अशोक आरदवाड, बाळकृष्ण धायगुडे, प्रदीप भोकरे, संजय अयाचित, अपर्णा गोवंडे, सुरेखा मदने, डॉ. भाग्यश्री कुलकर्णी, डॉ. मुकुंद भिसे, श्रुतिकांत ठाकूर, दीपरत्न निलंगेकर, एड. राणीताई स्वामी, सुधन्वा पत्की आदी मान्यवरांनी केले आहे.

**लातूर जिल्हा पोलीस ...**(पान १ वरुन) : चार विभागांचे संघ सहभागी होते. पोलीस मुख्यालयाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. उत्कृष्ठ महिला खेळाडू व पुरुष खेळाडू यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. सदर क्रीडा स्पर्धेच्या समारोपाच्या वेळी पोलीस अधीक्षक स्वामी मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी, पोलीस उपाधीक्षक ग्रह गजानन भातलवंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) रणजीत सावंत, उपविभागीय पोलीस अधिकारी (अहमदपूर) मनीष कल्याणकर, उपविभागीय पोलीस अधिकारी (औसा) चौधरी, उपविभागीय पोलीस अधिकारी (निलंगा) नितीन कटेकर, स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांच्यासह लातूर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, शाखाप्रमुख यांची उपस्थिती होती. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी राखीव पोलीस निरीक्षक शेख गफ्फार, पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख, क्रीडा प्रमुख रामलिंग शिंदे, युसुफअली धावडे, प्रशांत स्वामी, अन्वर शेख, प्रशिक्षक भारती, सय्यद, गडेराव यांनी परिश्रम घेतले. क्रीडा स्पर्धा पारदर्शक पार पडण्याकरिता इतर विभागातील कार्तिक मस्के,अमजद शेख, समीर शेख, साहिल समुद्रले, योगेश स्वामी, प्रकाश आयरीकर ,सोपान रुक्मे, रुपाली कांबळे, अमर सूर्यवंशी, समाधान बुर्गे,धनंजय नागरगोजे, बोबडे, महेश पाळणे यांनी पंचाची भूमिका पार पाडली.

# सामाजिक व आर्थिक समतेसाठी लढणारा - डॉ. आंबेडकर

महाडच्या चवदार तळयातील सर्वांसाठी म्हणजेच अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. पाणी म्हणजे जीवन, तेच त्यांच्यापासून हिरावून घेतले यासाठी सत्याग्रह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मार्च १९२७ रोजी सत्याग्रही तळयाकडे निघाले. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी जे पाणी, ते मिळवायचेच एवढयासाठी चालेले होते. डॉ. आंबेडकर सर्वांच्या पुढे होते. अस्पृश्य म्हणून मुंबईच्या कॉलेजात ज्यांनी पाण्याचे हाल सोसले, बडोद्याच्या हॉटेलमध्ये ज्यांनी मार खाल्ला ते खरोखरच सत्याग्रहींचे सेनापती शोभत होते. सर्वजण तळयाजवळ येऊन पोहोचले, प्रथमतः त्यांनी पाण्याचा घोट घेऊन इतरांना पाणी पिण्याची मोकळीक दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवन म्हणजे भारतीय जनतेच्या समतेच्या लढयाची अविस्मररणीय गाथा होय. दलितोत्ध्दारक, धर्मसुधारक, प्रकांडपंडीत, समाजशास्त्रज्ञ व संविधानाचे शिल्पकार असे विविध पैलू त्यांच्या जिवनाशी निगडीत आहेत. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विचार करता, तत्कालीन सामाजिक, राजकिय प्रश्र्नांना ते कसे सामोरे गेलेत या प्रश्र्ना प्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार ही त्यांनी केला. या सर्व बाबींचा मागोवा घेणे अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा आपला समाज एक संघ असला पाहिजे, यावर त्यांचा अधिक भर होता. सर्व समाज शहाणा करुन सोडावा ही त्यांची कल्पना होती. जे–जे आपणांसी ठावे, ते–ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनही सोडावे सकल जण हा रामदासांचा संदेश त्यांनी आचरणात आणला आणि इतरांना सुध्दा सांगीतला, या संदेशाकडे डोळेझाक करुन चालणार नाही.

नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी ५ वर्षे सतत झगडत राहिले शेवटी १९३५ मध्ये नाशिकचे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. त्याचवेळी बौध्द धर्म स्विकारणार अशी घोषणा त्यांनी येवले (नाशिक) या ठिकाणी केली. त्या दरम्यान बहिष्कृत भारत नावाचे नियतकालिक सुरु केले. आपल्या भारत देशात इंग्रजांचे राज्य होते नंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र्य झाला. भारतातल्या लोकांना विशिष्ट पध्दतीने राज्यकारभार करता यावा यासाठी भारताची स्वतंत्र्य राज्यघटना असणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने भारतीय विद्वानांची एक घटना (तज्ञ) समिती नियुक्त करण्यात आली. त्यात बॅरी. तेजपाल सप्रु, बॅरी. जयकर आणि बॅरि. आंबेडकर हे होते. परंतु उर्वरित दोन तज्ञांनी नकार दिल्यामुळे पं. जवाहरलाल नेहरुंनी ही जबाबदारी बॅरी. आंबेडकर यांच्यावर सोपविली, ती त्यांनी स्विकृत केली. एवढा मोठा कायदेतज्ञ असलेल्या या महात्म्याचे पूर्वजीवन मात्र अत्यंत वाईट गेले असतांना बेदरकारपणे आगपाखड करता आली असती, पण ती सुध्दा त्यांनी केली नाही. अशावेळी देखील बहिष्कृतांच्या चळवळीला वर्ग लढयाचे स्वरुप येणे सहज शक्य होते, त्यातून भारतीय एकसंघतेला तडा जाऊन धर्माच्या नांवावर या देशाची शकले झाली. तशी परिस्थिती उद्भवली असती परंतू भारतीय हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय समाजात त्यांना बदल हवा होता पण



त्यासाठी समाजप्रबोधन हाच मार्ग होय, अशी त्यांची दृढनिष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रनिष्ठा त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सर्वात महत्वाचा मानला.

स्वतः बरोबर इतरांचा विचार करुन त्यांनी राष्ट्रनिष्ठे पुढे इतर निष्ठा गौण मानल्या. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना रुजविणे व वाढविणे महत्वाचे आहे. या निष्ठेला कोणतीही निष्ठा स्पर्धा करु शकत नाही. संकुचित जातीय, धार्मीक किंवा राजकिय व अन्य स्वार्थासाठी त्यांनी राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. त्यांची ही भावना स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेत सहभागी होतांना, कायदामंत्री असतांना रिपब्लीकन पक्ष काढतांना, धर्मांतराची घोषणा करतांना अशा महत्वाच्या जीवनप्रसंगी सतत जागी राहिल्याचे दिसेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रपुरुष संबोधले पाहिजे. खरोखरच डॉ. आंबेडकरांना वगळून हा देश मोठा झाला असता काय ? याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. डॉ. आंबेडकरांची कायदामंत्री म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी अहोरात्र कष्ट करुन मोठया कष्टाने आपल्या अंगी असलेली सगळी बुध्दिमत्ता प्राणपणाला लावून २ वर्षे ११ महिने १७ दिवसात घटना लिहून पुर्ण केली. त्यामुळे त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून संबोधले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर जेवढी जबाबदारी होती तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही पुरुषावर नव्हती. ते जर अजुन जगले असते तर कदाचित त्यांच्या मनासारखे निश्र्चित घडले असते, हे कोणीही नाकारु शकत नाही.

भीमाच्या शिक्षणासाठी रामजींनी अतोनात कष्ट घेण्याचे ठरविले होते. आपल्या मुलाला प्रखर बुध्दीमत्तेची दैवी देणगी लाभली असल्याचे ओळखून भीमाच्या हिंदु समाजातील एका अडाणी व क्रुर रुढीमुळे त्याकाळी अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या जातीत जन्मल्यामुळे काही जणांकडुन क्षणोक्षणी अपमान होऊ लागला. पण त्यातही त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या केळुसकर गुरुजींच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे भिम उत्तम तऱ्हेने मॅट्रीकची परीक्षा १९०७ साली पास झाला, चाळीतील लोकांनी मोठा थाटात सत्कार केला. रामजी पुढे मुलांच्या शिक्षणासाठी मुंबईस आले. भीमाने मुंबई सारख्या एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्रवेश केला. जातीने अस्पृश्य असल्याने भिमाला इच्छा असूनही संस्कृतचा अभ्यास करता आला नाही. पार्शियन भाषेत मात्र त्याचा पहिला नंबर असे. आनंदाची अभ्यासातील प्रगती बेताचीच असल्याने त्यास नोकरीला लावले, नंतर आनंद व भीमाचे लग्न केले. लग्नाच्या वेळी भीमा १४ वर्षाचा रमा ९ वर्षाची होती.

बडोदे सरकारची शिष्यवृती मिळवून एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजात शिक्षण देखील भीमा महार असल्यामुळे त्याला योग्य मार्गदर्शन व मदत मिळाली नाही. तरीही तशाच परिस्थितीत भीमराव एल्फिन्स्टन कॉलेज मधुन १९१२ साली बी.ए. झाले. बडोद्याच्या महाराजांच्या ऋणातून अल्पसे मुक्त होण्यासाठी त्यांनी त्यांचेकडे नोकरीचा अर्ज केला त्यांना सयाजीराव गायकवाडांच्या कडे नोकरी मिळाली. परंतु वडिल आजारी असल्याची तार मिळताच डॉ. आंबेडकर मुंबईस निघाले. सुरत स्टेशनवर वडिलांसाठी बर्फी घ्यावी म्हणून ते उतरले असताना गाडी निघून गेली. त्यामुळे घरी पोहोचण्यास त्यांना उशीर झाला. वडिलांचे डोळे मुलाला पाहण्यासाठी आतूर झाले होते. मुलगा आल्याचे कळताच त्यांनी डोळे उघडले. आपल्या लाडक्या मुलाच्या अंगावरुन प्रेमाने हात फिरविला आणि त्या महान पुरुषाने हया जगाचा शेवटचा निरोप घेतला. बडोद्याच्या प्रागतिक राजे सयाजीराव साहेबांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांना अमेरिकेत पाठविले. आपण केवळ शिक्षणासाठी अमेरिकेत आलो आहोत याची जाणीव भीमरावांना होती. एखाद्या तपस्व्या प्रमाणे त्यांनी उपासना केली. ते अभ्यासात दिवसाचे अठरा तास घालवू लागले. १९१५ साली ते एम.ए. झाले. त्यानंतर त्यांनी निरनिराळ्या विषयांवर दोन–तीन प्रबंध लिहिले. हया कष्टांचे फळ म्हणून १९२४ साली कोलंबिया विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी दिली. सरकारी कचेरीत त्यांना मोठया हुद्याची जागा देण्याऐवजी केवळ २२५ रुपयांवर खर्डेघाशी करावी लागू लागली. हाताखालचे लोक देखील त्यांना पाणी देत नसत व त्यांच्या टेबलावर दुरुन फाईल टाकत. मानी भीमरावांना मिळत असलेली ही वागणूक पसंत नव्हती. त्यांचा स्वाभिमान दुखावला गेला म्हणून ते मुंबईला परतले.

एवढे झाले तरीही त्यांनी धीर खचू दिला नाही, थोडीशी खटपट करुन त्यांनी सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची जागा मिळवली, पैसा जमवला व १९२० साली ते अपुर्ण अभ्यास करण्यासाठी पुन्हा एकदा लंडनला रवाना झाले. तिथे ते सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत निरनिराळ्या ग्रंथालयात पुस्तके वाचीत आणि रात्री दहानंतर दिवस उजाडेपर्यंत त्यांचा अभ्यास चालू असे, त्याचे फळ १९२३ मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांना दिलेली डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी होय. बहिष्कृत वर्गावर वर्षानुवर्षे जो अन्याय होत आलेला आहे तो वेशीवर टांगून त्याचे निराकरण झाले पाहिजे ही त्यांची मागणी होती. बहिष्कृतांचा हा लढा लढतांना त्यांनी नेमही विधायक आणि व्यापक भूमीका घेतली आणि अस्पृश्य समाजाला स्वतःहुन काही करावेसे वाटावे या दृष्टीने त्यांच्यात चैतन्य निर्माण करायचे अशा दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची पाऊले पुढे टाकण्यास सुरुवात केली. त्यापैकी पहिली सुरुवात म्हणजे १९४० साली त्यांनी सुरु केलेले पाक्षिक मुकनायक हे होय.

पिकते तेथे विकत नाही हा सिध्दांत माहित आहे, तेव्हा आपल्याजवळ असलेल्या माणसाचे गुण आपण ओळखु शकत नाही. दूसऱ्या माणसाला त्याची पारख होते हे सर्वविदित आहे. म्हणूनच १ जून १९५२ रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार करणारे अनेक ग्रंथ लिहिले, भाषणे दिली आणि आपली दलिताबद्दलची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या प्रेरणेने शाळा, प्र–शाळा तर निघाल्याच पण उच्च शिक्षण देणारी महाविद्यालयेही निघाली. शिक्षण, समाजकल्याण, अर्थकरण, राजकरण या सर्वामध्ये त्यांनी आपले स्वतंत्र, तर्कशुध्द विचार मांडून दाखविले. दलित समाजात जागृती होत गेली तेव्हा त्यांना ज्ञानाचे महत्व पटले. अनेक दलित आज समाजात विचारवंत म्हणून मान्यता पावले आहेत, त्यामागे डॉ. बाबासाहेबांची प्रेरणा आहे. समाजाने त्यांच्या विषयीचा आदर अनेक प्रकारे व्यक्त केला आहे. आज त्यांचे नाव दिलेली कितीतरी विद्यालये, महाविद्यालय, विद्यापीठे कार्यरत आहेत.

हिंदु धर्मातून परधर्मात जाण्याचा विचार करतानाही भारतातच उगम पावलेल्या बौध्द धर्म याची नागपूर शहरात आपल्या लाखो अनुयायासह १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी बौध्द धम्माची दीक्षा घेतली. आपण जो धम्म घेतला तो उत्तमरीतीने पाळण्याचा निर्धार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये म्हणून आपण दृढनिश्र्चय केला पाहिजे हे आपल्याला साधेल तर आपण आपल्याबरोबर देशाचा इतकेच काय तर जगाचाही उध्दार करु. कारण या धर्माचे लोन जागतीक पातळीवर उंचावत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निंधनाने सामाजिक व आर्थिक समतेसाठी लढणाऱ्या एका झुंजार योध्दयाला आज भारत देश मुकला आहे, अशा या थोर महापुरुषाच्या ६८ व्या महापरिनिर्वाणदिनी पुण्यस्मरण !

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी - ९९२३६२०९१९**
**ई-मेल** pravinbagdegmail.com

## सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाल्यास वाढत्या वाहनांना आळा बसेल

इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाहनांची संख्या जास्त आहे. मुंबईत तर वाहनांच्या संख्येने विक्रम गाठला आहे. मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईसह राज्यातील चार चाकी वाहनांची घनता २५ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. दुचाकी वाहनांच्या संख्येत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. चार चाकी वाहनांची देखील तीच परिस्थिती आहे एकट्या मुंबईत चारचाकी वाहनांचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्र्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी वाहनतळांची संख्या मात्र अपुरी आहे त्यात १० हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्र्चिम दृदगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. जी मुंबईची अवस्था आहे जवळपास तशीच अवस्था राज्यातील अन्य मोठ्या शहरांची आहे. मुंबईसह राज्यातील इतर मोठ्या शहरातील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले उचलायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईसह राज्यातील प्रमुख शहरात प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्र्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाढत्या वाहनांना आळा घालणे आवश्यक आहे. जर मुंबईसह राज्यातील इतर शहरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्र्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## वीरशैव लिंगायत समाजाच्या वधू -वर परिचय मेळाव्याला उदंड प्रतिसाद वधू -वर संशोधनाचा विषय सुलभ व्हावा व एकमेकाची ओळख व्हावी : उमाकांत कोरे

लातूर : १९८८ पासून समाजासाठी काम करतोय. अनेकांचे विवाह जुळवून दिले. वीरशैव लिंगायत समाजातील विवाह इच्छुकासाठी सर्वाधिक नोंदणी असलेली माहितीपुस्तिका दरवर्षी प्रकाशित केली जाते. महाराष्ट्रातील सर्वात मोठा विनामूल्य लिंगायत वधू वर परिचय १२वा राज्यस्तरीय मेळावा ३ नोव्हेंबर रोजी व्यापकरित्या पार पडला. त्याचा दुसरा भाग आज १डिसेंबर रोजी वीरशैव समाज सांस्कृतिक भवन, खंडोबा गल्ली लातूर येथे मोठ्या थाटात पार पडला. त्यावेळी या मेळाव्याचे मुख्य संयोजक उमाकांत अप्पा कोरे हे बोलत होते. यावेळी या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विजयकुमार चितकोटे हे होते. यावेळी व्यासपीठावर पुन प्रमुख विवेक जानते, संयोजक नागेश कनडे, अध्यक्ष अभिषेक चौडे, प्रसाद नागुरे, वैभव विभुते, बालाजी पिंपळे, राजाभाऊ हलकुडे, दिलीप होनराव, अशोक अप्पा उपासे, उमाकांत नागोरे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वीरशैव लिंगायत रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल महादेव ( नाममात्र विवाह) व



अप्पा लामतुरे यांचा वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने सत्कार करण्यात आला. तर समाजातील घटस्फ़ोटांची संख्या ही मागील ५ वर्षात दुप्पट झाली आहे– ही बाब गंभीर आहे. घटस्फोटीतांचा पुनःरविवाह होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. मुलीची शिक्षणातील संख्या वाढली.मागील वर्षी ८२ डॉक्टर्स मुलीची आणि ३२ डॉक्टर्स मुलांची नोंद होती. तर ३७० इंजिनियर मुली व ४०० इंजिनिअर मुलींची नोंद होती. ६५ टक्के मुली स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. स्त्री ही नात्याची निर्माती आहे व नात्यांच्या परीघात ती अधिक सुरक्षित आहे–असे मत विवेक जानते यांनी मांडले.ज्यांचे अल्पावधीत घटस्फोट झाले आहेत– त्यांनी घटस्फोटीत घटस्फोटीत (विवाह रद्द) अशा संज्ञा वापरुन माहिती पुस्तिकेत नोंदणी करावी– असेही आवाहन करण्यात आले.

या लिंगायत वधू –वर परिचय मेळाव्यासाठी लिंगायत समाजातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परीश्रम घेतले. या मेळाव्यात भोजनाची व्यवस्था आणि नोंदणीची व्यवस्था मोफत करण्यात आली होती. नोंदणी करिता संपर्क : प्रसाद नागुरे मो. ९४२३७७६६६७.या वधू वर परिचय मेळाव्यास महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, तेलंगणा आदी राज्यातून मोठ्या संख्येने वधू वर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन – महेश कोळ्ळे, धुळप्पा जयशेट्टे, प्रा. आशिष स्वामी तर आभार महेश कोळ्ळे यांनी मानले.

## मुलाने स्विगीवर केली ऑर्डर, पण अशी विनंती केली की झाली व्हायरल

मुंबई : आता काळ पूर्णपणे बदलला आहे आणि लोकांची ऑफलाइनऐवजी ऑनलाइन वस्तू खरेदी करण्याची क्रेझ वाढली आहे. अशा परिस्थितीत लोक आपला वेळ वाचवण्यासाठी ऑनलाइन वस्तू ऑर्डर करतात. आता तुम्ही अन्न किंवा फळे आणि भाज्या खरेदी करा, लोक त्यांच्या घरासाठी या गोष्टी ऑनलाइन ऑर्डर करतात. तथापि, बऱ्याच वेळा असे घडते की लोक त्यांच्या ऑर्डर दरम्यान अशा विनंत्या करतात. ज्याची क्वचितच कोणी कल्पना केली असेल! असाच काहीसा प्रकार आजकाल लोकांमध्ये पाहायला मिळाला, जिथे एका व्यक्तीने रेस्टॉरंटमधून एक विचित्र रिक्वेस्ट केली, जी ऐकून तुम्ही तुमच्या हशावर नियंत्रण ठेवू शकणार नाही. तुम्ही बऱ्याचदा एक गोष्ट पाहिली असेल की जेव्हा लोक स्विगी किंवा झोमॅटो वरून ऑर्डर करतात, तेव्हा ते त्यांच्यासाठी कस्टमाइज्ड पद्धतीने काहीतरी खास करून मागण्याचा प्रयत्न करतात. आता हीच घटना बघा जिथे एका मुलाने फुकटात कांदे मिळवण्याचा मार्ग शोधला, जे पाहून तुम्हाला हसू येईल. बटाटे, टोमॅटो आणि कांद्याच्या वाढत्या किमती समजून घेताना एका व्यक्तीने स्विगीमधून स्वतःसाठी जेवण ऑर्डर केले, तेव्हा त्याने त्यासोबत लिहिलेली चिठ्ठी पाहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. त्या व्यक्तीने नोट्समध्ये लिहिले की, भाऊ, कृपया गोल कापलेले कांदे पाठवा. कांदे खूप महाग आहेत, मी ते विकत घेऊ शकत नाही म्हणून कृपया मला काही कांदे पाठवा, या पोस्टसोबत, त्या व्यक्तीने एक दु:खी इमोजी देखील जोडला. ही पोस्ट ठशववळीं गशक्ष लरींरपशरींळिलज्ञश्रशी नावाच्या अकाऊंटद्वारे शेअर केली गेली आहे, जी आतापर्यंत लाखो लोकांनी पाहिली आहे आणि कमेंट करून त्यांची प्रतिक्रिया दिली जात आहे.

# सत्ते शिवाय परिवर्तन घडवून दाखवल्याचा इतिहास वाचा.

महात्मा जोतिबा फुले यांचे पूर्ण नाव जोतीराव गोविंदराव फुले. यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला.यांचा जीवन संघर्ष वाचा समजून घ्यावा कोणतीही सत्ता नसतांना सामाजिक,शैक्षणिक बदल घडवून इतिहास निर्माण केला.बाबासाहेब आंबेडकर (१४ एप्रिल, १८९१ – ६ डिसेंबर, १९५६), हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ,राजकारणी,तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते.त्यांनी मानसला माणूस बनविण्यासाठी चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री,स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री,भारतीय संविधानाचे शिल्पकार,भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते.देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' किंवा 'आधुनिक भारताचे निर्माते' असेही म्हणतात.सत्ते शिवाय समाजात,देशात परिवर्तन घडवून दाखवल्याचा इतिहास आहे. त्यांचा जीवन संघर्ष हा प्रेरणादायी आहे तो वाचल तर इतिहास घडवित येतो.आणि न वाचता काहीच करता येत नाही.आजची पिढी जेव्हा संघर्ष करते तेव्हा उद्याची पिढी सन्मानाने जगते.आजची पिढी जेव्हा लाचार होते तेव्हा उद्याची पिढी गुमाल बनते.त्यासाठी आता आपणास गांभीर्याने विचार करून जगावे लागेल.

२०२४ ला लोकसभा निवडणूक झाली,नंतर २० नोव्हेंबर २०२४ ला महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणूक झाली.२३ नोव्हेंबर २०२४ ला निकाल लागला. त्यासाठी राज्यातील बहुसंख्य म्हणजे ६५ ते ७० टक्के मतदारांना धन्यवाद म्हटले पाहिजे.




महागाई,बेरोजगारी,शेतकऱ्याला हमी भाव,शिक्षण आरोग्य कोणत्या ही मुद्द्यांवर नव्हे,तर धर्मावर मतदान केल.शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर आणि त्यांच्या संकटांवर दुर्लक्ष करून त्यांना मतदान केल.महिलांच्या सुरक्षेऐवजी १५०० रुपयांसाठी मतदान केल. रोजगार निर्माण करण्याऐवजी बेरोजगारीला प्रोत्साहन देणाऱ्यांना मतदान केल.छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्यांना,तो अपमान विसरून मतदान केल.मराठा समाजावर अन्याय करणाऱ्यांना,तो अन्याय विसरून मतदान केल.महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला गहाण टाकून,आपला महाराष्ट्र उत्तर प्रदेश किंवा बिहारसारखा बनवण्यासाठी मतदान केल.आणि शेवटी,आपल्या महाराष्ट्राच्या विकासाला बाजूला ठेवून गुजरातच्या विकासाला प्राधान्य देऊन मतदान केल.बहुसंख्य हिंदुनी आणि मराठी माणसांनी मतदान केले. त्यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद महाराष्ट्र मतदार लिहले पाहिजे.तुमच्या मतदारांच्या निर्णयाने खूप काही स्पष्ट केले.

या निकालाने महाराष्ट्राला वैचारिक,धार्मिक गुलाम बनवला एवढं मात्र नक्की झाले. काही महाराष्ट्रातल्या दलाल लोकांमुळे (१२) बारा कोटीचा महाराष्ट्र हरला दोन गुजराती जिंकले. देशाच सुप्रीम कोर्ट आर एस एस प्रणीत भाजपा चालवते,देशाचा निवडणूक आयोग आर एस एस,प्रणीत भाजपा चालवते,देशाचं सरकार आर एस एस प्रणीत भाजपा चालवते,महाराष्ट्राचे सरकार आर एस एस,प्रणीत भाजपा चालवते,आता मुंबई महानगरपालिका आर एस एस,प्रणीत भाजपा चालविण्याचे स्वप्न पाहते. महाराष्ट्रातले उद्योग धंदे आदानी अंबानी चालवणार आम्ही असंघटित कष्टकरी कंत्राटी कामगार गुलाम म्हणून त्यांची सेवा करणार.नरेंद्र मोदी अमित शहा महाराष्ट्राचे बाप झाले आहेत आदानी अंबानी महाराष्ट्राचे मालक आणि महाराष्ट्रातली १२ कोटी जनता या चौघांची नोकरी करणारे मजूर,शेतमजूर,कामगार,कर्मचारी अधिकारी शासन व संपूर्ण प्रशासन गुलाम होणार आहेत.आज पहिलीच वेळ आम्ही मराठी हिंदू असल्याचा सांगायला आम्हाला लाज वाटते.महाराष्ट्रातल्या तमाम मराठी बांधवांनो आज खऱ्या अर्थाने १०५ हुतात्मे हरले महाराष्ट्र हरला आम्हाला लाज वाटली पाहिजे आम्ही आमच्याच घरात गुलाम झालो !.मागच्या पिढीने जेव्हा संघर्ष केला. तेव्हा आजची पिढी सन्मानाने जगते.आजची पिढी जेव्हा लाचार होते तेव्हा उद्याची पिढी गुमाल बनते.

असंघटित कष्टकरी कामगार मजूर शेतमजूरांनो पुन्हा लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी रस्त्यावरची लढाई लढूया.प्रबोधन करत राहू संविधानाची मूल्य जनतेत घेऊन जाऊ. आणि सत्ते शिवाय परिवर्तन होऊ शकते हे महात्मा फुले,विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन संघर्ष डोळ्यासमोर ठेऊन जगण्यासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवा,कोणी फुकट,मोफत देतो त्यामागे त्यांचे मोठे आर्थिक गणित असतात.हे आपण समजून घेण्यास कमी पडलो. जिसकी संख्या भारी उतनी उसकी भागेदारी आता उरली नाही.

उत्तरेकडच्या शिखांची,राजस्थान,हरियाणा,पंजाब दिल्लीच्या शेतकऱ्यांची आंदोलनजीवी प्रेरणा घेऊ. पुन्हा पुन्हा रस्त्यावरून लोकशाही संविधान जीवंत ठेवू.सत्ता आली म्हणजे सगळं हातात आले असे होत नसते.सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी.विविध चळवळीच्या लोकशाहीवादी लोकांनी.पुन्हा एकत्र यावे. एकमेकांशी संवाद करून जनतेत जाऊन जगण्यासाठी जन आंदोलन हे त्यावरचा दबाव गट लोकशाहीत महत्वाचा असतो. तोच अधिकार आपल्याला जगण्यासाठी प्रेरणा देऊ शकते.दूसरा पर्याय लाचार गुलाम म्हणून जगण्याची अन्याय अत्याचार सहन करण्याची तयारी ठेवावी लागेल. यासाठी ज्यांनी संघर्ष केला सत्ते शिवाय समाजात आणि देशात परिवर्तन घडवून दाखवल्याचा इतिहास वाचावा लागेल. शेवटी आजची पिढी जेव्हा संघर्ष करते तेव्हा उद्याची पिढी सन्मानाने जगते. आजची पिढी जेव्हा लाचार होते तेव्हा उद्याची पिढी गुमाल बनते.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई.**

# मतदार संघ माझे कुटुंब याच भावनेतून सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणार - आ. रमेशआप्पा कराड

लातूर – लातूर ग्रामीण मतदार संघात विकास कामे करताना आजपर्यंत कधीही जात, धर्म पाहिला नाही यापुढील काळातही संपूर्ण मतदारसंघ हेच माझे कुटुंब याच भावनेतून मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणार आहे. कार्यकर्त्यांनीही सर्व समाज घटकांना सोबत घेऊन गोरगरीब जनतेचे प्रश्र्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत असे आव्हान लातूर ग्रामीणचे नवनिर्वाचित आमदार रमेशआप्पा कराड यांनी केले.




लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातून भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांचा घवघवीत यश संपादन करून नवा इतिहास घडविल्यानंतर आज रविवारी सकाळी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशआप्पा कराड यांचा खरोळा जिल्हा परिषद मतदार संघातील विविध गावातील भाजपासह महायुती कार्यकर्त्यांच्या वतीने जाहीर सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. यावेळी भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष अँड दशरथ सरवदे, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष वसंत करमुडे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुरेंद्र गोडभरले यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या सत्कार कार्यक्रमास भाजपासह महायुतीचे कार्यकर्ते मतदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे उपकार मी कदापी विसरू शकत नाही. प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार समजून काम केले. केलेल्या प्रयत्नाला यश आले याबद्दल सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, विधानसभेची ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशीच झाली. या लढाईत धनशक्तीचा पराभव होऊन जनशक्तीचा विजय झाला आहे. देशमुख यांनी अनेकांना विकत घेण्याचा प्रयत्न केला मात्र माझा गरीब कार्यकर्ता विकला गेला नाही. प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतः उमेदवार समजून या निवडणुकीत गावागावात भाजपाला कशा पद्धतीने मताधिक्य मिळेल यासाठीच प्रयत्न केले कार्यकर्त्याच्या मेहनतीने आणि लाडक्या बहिणीच्या आशीर्वादाने आपल्याला हे यश मिळाले आहे.

गेल्या १५ – २० वर्षापासून बलाढ्य शक्तीच्या विरुद्ध गोरगरीब सामान्य माणसाच्या हितासाठी संघर्ष केला या संघर्षाला कार्यकर्त्यांनी साथ दिली. विधान परिषदेचा आमदार या नात्याने काम करत असताना मतदार संघात शेकडो कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आणि गावागावातील विकास कामांना गती दिली. आता विधानसभा आमदारकीच्या माध्यमातून मिळालेल्या संधीचं सोनं करून दाखवू लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ एक विकासाचे मॉडेल मतदार संघ निर्माण करू असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशात आणि राज्यात आपले सरकार असल्याने गोरगरीब सर्वसामान्य गरजू प्रत्येक व्यक्तीपर्यंत विकास पोहोचला पाहिजे यासाठी आपण सर्वजण काम करू. येणाऱ्या काळात होणाऱ्या ग्रामपंचायत, सोसायटीसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुका जिंकायच्या आहेत आज माझ्यासाठी काम केले येणाऱ्या काळात कार्यकर्त्यांना मान सन्मान निवडून देण्यासाठी पदावर बसविण्यासाठी काम करणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊस तोडणी बाबत भीती बाळगण्याचे अथवा घाबरण्याची गरज नाही मी तुमच्या पाठीशी आहे. आडवणूक अथवा पिळवणूक होवू देणार नाही साखर कारखान्यांनी ऊस तोडणी कार्यक्रमांनुसारच शेतकऱ्यांच्या उसाची तोडणी करावी जोपर्यंत कारखाना कार्यक्षेत्रात ऊस आहे तोपर्यंत कार्यक्षेत्राबाहेरील गेटकेनचा ऊस येता कामा नये यासाठी आपण निश्र्चितपणे प्रयत्न करू अशीही ग्वाही आ. कराड यांनी यावेळी बोलताना दिली. प्रारंभी महेंद्र गोडभरले यांनी प्रास्ताविक केले तर नवनाथ भोसले यांनी सविस्तर मनोगत व्यक्त करून रमेशआप्पा आमदार व्हावेत हे अनेक वर्षापासून कार्यकर्त्यांनी पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरले असल्याचे बोलून दाखविले.

# मुलाचा संघर्षः अपेक्षा, जबाबदाऱ्या आणि त्याचा जीवनप्रवास

आजच्या काळात मुलाच्या जीवनातील संघर्ष आणि त्याच्यावर टाकल्या जाणाऱ्या अपेक्षांबद्दल बोलणे महत्त्वाचे झाले आहे.भारतीय समाजात मुलाला नेहमीच जबाबदाऱ्यांचा केंद्रबिंदू मानले जाते.तो घराचा आधारस्तंभ असेल,आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडणारा असेल,आणि कुटुंबासाठी सर्व काही करणारा असेल,अशी एक पिढ्यान् पिढ्या चालत आलेली धारणा आहे.मात्र,या जबाबदाऱ्यांमुळे मुलांना प्रचंड मानसिक, शारीरिक आणि सामाजिक दबाव सहन करावा लागतो.

मुलाचा संघर्ष: अपेक्षा आणि जबाबदाऱ्या मुलगा जन्माला आल्यानंतरच त्याच्यावर अनेक अपेक्षा लादल्या जातात.शिक्षणामध्ये यश मिळवून मोठ्या पदावर जाणे, घरच्यांना आर्थिक स्थैर्य देणे,आणि कुटुंबाची प्रतिष्ठा टिकवणे यांसारख्या अपेक्षा त्याच्या आयुष्याचा भाग बनतात.त्याला चांगले गुण मिळवावे लागतात, चांगली नोकरी मिळवून समाजात स्वतःचे स्थान निर्माण करावे लागते.घरच्यांच्या अपेक्षांमुळे मुलांच्या आयुष्यातील साधेपणा हरवतो.समाजात प्रतिष्ठा टिकवण्यासाठी त्याच्यावर केलेला दबाव कधी कधी त्याला मानसिक आरोग्याच्या समस्यांपर्यंत नेतो.त्याला स्वतःचे स्वप्न पाहण्याचीही संधी मिळत नाही,कारण घर आणि समाजाच्या अपेक्षांच्या ओझ्याखाली तो स्वतःचा मार्ग विसरतो.

मुलीच्या घरच्यांकडून अपेक्षा विशेषतः लग्न झाल्यावर,मुलाला मुलीच्या घरच्यांकडूनही बऱ्याच अपेक्षा असतात.त्याला फक्त पतीच नाही तर आदर्श जावई होण्याचेही आव्हान स्वीकारावे लागते.मुलीच्या कुटुंबीयांना वाटते की मुलाने त्यांचीही जबाबदारी पार पाडावी, त्यांचा आदर ठेवावा,आणि त्यांच्या गरजा पूर्ण कराव्यात.यामुळे मुलावर जबाबदाऱ्या दुप्पट होतात.

मुलाचा संघर्ष: त्याला फेस करावे लागणारे प्रश्र्न मुलाला आयुष्यात पुढे जाताना अनेक प्रश्र्नांना सामोरे जावे लागते:१) करिअरचा दबाव: चांगल्या नोकरीसाठी स्पर्धा आणि आर्थिक जबाबदाऱ्यांमुळे प्रचंड ताण जाणवतो. २) सामाजिक अपेक्षा: घरच्यांपासून ते मित्रपरिवार आणि समाजातील लोकांकडून येणाऱ्या अपेक्षांमुळे मुलाची वैयक्तिक आयुष्य हरवते. ३) भावनिक ताण: समाजात मुलाने रडायचे नाही किंवा कमजोरी दाखवायची नाही अशी शिकवण दिली जाते, ज्यामुळे तो स्वतः च्या भावना व्यक्त करू शकत नाही.

मुलगा कसा जगतो? या सर्व गोष्टींच्या ओझ्याखालीही मुलगा आपल्या स्वप्नांसाठी आणि कुटुंबासाठी सतत संघर्ष करत राहतो. त्याला स्वतःचे दुखः बाजूला ठेवून दुसऱ्यांना आनंद देण्यासाठी झटावे लागते. तो यशस्वी होण्याची आणि सर्वांना खुश ठेवण्याची धडपड करत राहतो. परंतु, कधी कधी ही धडपड त्याला ताणतणावाकडे घेऊन जाते.

मुलांसाठी काय बदल घडवायला हवेत?.१) समजूतदारपणा: पालकांनी मुलांवर लादल्या जाणाऱ्या अपेक्षांमध्ये समतोल साधायला हवा. २) भावनिक आधार: मुलांनीही भावना व्यक्त केल्या पाहिजेत,आणि त्यांना मानसिक आधाराची गरज असते हे स्वीकारले पाहिजे. ३) स्वातंत्र्य: मुलांना त्यांच्या आवडीनुसार निर्णय घेण्याची आणि स्वतःचा जीवनमार्ग निवडण्याची मुभा दिली पाहिजे.

निष्कर्ष:= मुलाचा संघर्ष हा फक्त त्याच्यापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण समाजाचा विषय आहे.अपेक्षा आणि जबाबदाऱ्यांचा ओझा हलका करणे गरजेचे आहे,जेणेकरून प्रत्येक मुलगा आनंदी आणि समाधानी जीवन जगू शकेल.मुलांनी फक्त कुटुंबाचा आधारस्तंभ म्हणून नव्हे, तर माणूस म्हणूनही स्वतःचे आयुष्य घडवण्याचा अधिकार आहे.

**प्रशांत खंदारे – ९७६७४७८४७२,मुंबई**

# ऊसतोड कामगाराची लेक आम्रपाली पारवे बनली अधिपरिचारिका!

कळवा (ठाणे) : आंबेडकरी साहित्य चळवळीची मुलूख मैदानी विद्रोही तोफ,विद्रोही कवयित्री आम्रपाली पारवे (कोविड योद्धा) यांची महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागात हिंगणघाट, (जि.वर्धा) येथे अधिपरिचारिकापदी नियुक्ती झाली.

महाराष्ट्रातील दुष्काळी जिल्हा म्हणून ओळख असलेल्या बीड जिल्ह्यातील वैद्यकिनी गावी ऊसतोडीचे करणाऱ्या,दारिद्र्य पाचवीला पुजलेल्या आयु.ज्ञानोबा पारवे व आयुनी. सुशिला पारवे या दांपत्याच्या पोटी जन्मलेल्या आम्रपाली ही जन्मजात हुशार मुलगी. पारवे दांपत्य अल्पशिक्षित असूनही त्यांनी बुद्ध,शिव,शाहू,फुले,आंबेडकरी विचारांचं भिमकडू मुलांना पाजले.वंश परंपरेने आंदन मिळालेल्या गरिबीवर त्यांनी ऊसतोडीच्या कोयत्याचे कचाकच घाव घालत मुलांना त्यांच्या आवडीचे शिक्षण दिले.त्यामुळे उडण्या–लढण्याचं बळ मुलांच्या पंखात आपोआप आले.त्यांचा मुलगा पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून खासगी नोकरी करतोय.तर तिन्ही मुलीनी नर्सिंगचे शिक्षण घेतलंय.त्यांपैकी दुसरी मुलगी आम्रपाली!. आई–बापाची गरिबी जवळून पाहिली– अनुभवलेली! आणि गरिबीवर मात करण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही,याची जाण ठेऊन झगडणारी,संघर्षाने पेटलेली! आम्रपालीने तिच्या लहान बहिणीसह गाव सोडून त्या नशीब बदलण्यासाठी मुंबई महानगरात आल्या. चेंबूरसारख्या आंबेडकरी चळवळीतील ठिकाणी वास्तव्याला आणि भायखळ्यातील नायर हॉस्पिटलमध्ये परिचारिका म्हणून काम करू लागल्या.

रुग्णसेवेचा वसा घेतलेली आम्रपाली कोरोणा काळात आपला जिव धोक्यात घालून कोविड रुग्णाची सेवा करणारी कोविड योद्धा म्हणून ओळखली जाणारी साधी,सरळ, प्रेमळ पण अंगात,डोक्यात बुद्ध,शिव,शाहू,फूले आंबेडकरी विचारांचा झंझावात असलेली विद्रोहाचा वणवा पेटवून आपल्या लेखणीने परिवर्तन घडवून आणणारी भिमकन्या आहे.तिनेक वर्षांपूर्वी कविसंमेलनात तिची ओळख झाली. आम्ही दोघं ही कवी असल्यामुळे साहित्याची मैत्री ही बहिण– भावाच्या नात्यात परावर्तीत झाली. चळवळीची चर्चा,कवितेबद्दल विचार विनिमय यातून एक दृढ साहित्यिक नाते निर्माण झाले.आमची दोघांचीही परिस्थिती गरीबीचीच ही देखील कॉमन बाब!

आंबेडकरी चळवळीत साहित्याच्या माध्यमातून तथा आपल्या कवितेतून परिवर्तनाच्या विचारांची मांडणी करुन समाज जागृती करणाऱ्या चळवळीबद्दल असणारे निस्सीम प्रेम,बुद्ध,शिव,शाहु,फुले,बाबासाहेबांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्यासाठीची अफाट तळमळ! वेळ,पैसा,बुद्धी खर्ची घालून युवकांच्या बरोबरीने आपले मोलाचे योगदान देणाऱ्या अनेक व्याख्यानातून,कवितेतून अंधश्रद्धा निर्मूलन,शेतकऱ्यांच्या समस्या–उपाय,स्त्री भ्रूण हत्या,मासिक पाळी,महिला सक्षमीकरण,आरोग्य,कुटुंब नियोजन अशा अनेक उपक्रमातून आपले सडेतोड विचार मांडून वैचारिक परिवर्तनाची लढाई लढणारी!



हेवा वाटावा अशी ही विद्रोही भिमकन्या .... आम्रपाली!

चळवळीसाठी काम केले पाहिजे,असा विचार जरी मांडला तरी आजच्या तरुण पिढीतील मुलं– मुली नाकं मुरडतात.पण,अशा मोजक्याच मुली आज चळवळीला वाहून घेताना दिसतायत.त्यातीलच एक कु.आम्रपाली !

चळवळीचं लिखाण,कविसंमेलने,काम याचबरोबर वैद्यकीय भरतीच्या परिक्षेचा अभ्यासहा तिचा दिनक्रम.अपार कष्ट,कधी नाईट,कधी डे ड्यूटी अशा अनेक समस्यांना तोंड देत घेतलेल्या मेहनतीला शेवटी २६ नोव्हेंबर २०२४ रोजी म्हणजे लाडक्या भाचीच्या संबोधीच्या वाढदिवशीच तिला वैद्यकीय अधिपरिचारिका नियुक्तीचा आदेश मिळाला.तिच्यासह माझाही आनंद गगनात मावेनासा झाला.संबोधीच्या वाढदिवसाचा केक कापत असतानाच ही गोड बातमी मिळाली.पाचवा वाढदिवस आयुष्यभर लक्षात राहील,असा आनंदमय साजरा झाला.आता गरिबी नावाची सटवी कायमची दूर होईल आणि सुख आमच्याही घरात नांदेल.ही सर्व कमाल आमच्या मुक्तीदात्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळेच ! बाबासाहेबांनी दिलेला शिक्षणाचा संदेश आज आमच्या जगण्याचा यशोमार्ग बनला आहे.

धन्यवाद बाबासाहेब...

आई –बाबांच्या कष्टाचं चीज झालं. तिला ज्या ज्या व्यक्तींनी मार्गदर्शन,मदत केली, त्या सर्वाचे या यशामध्ये योगदान आहे.सर्वांचे मनस्वी धन्यवाद.आम्रपालीला पुढील वैद्यकीय सेवेसाठी मंगलमय सदिच्छा.

खुप मोठी हो ! यशवंत हो ! किर्तीवंत हो ...

**आयु.र.वि.माळापुडेकर-**
**८६९१८८३२१४,**
**कळवा जिल्हा ठाणे.**

**वर्षा ..**

मतदारांच्या स्नेहाची
बरसावी वाटते वर्षा
मुख्य मंत्री पद मुख्य
खुणावतो बंगलावर्षा
पाहूकोण कधी कसा
गुंडाळे आपला गाशा
मधपोळे चटावे सर्वां
घोंघावू लागती माशा
स्वता खणावी विहीर
होई गहिरी गडद तृषा
हक्काचे घ्या हिसकून
पल्लवित नवी आशा
असो कारण काहीही
असे खुर्ची अभिलाषा
सत्ता बुडवे बुध्दीमत्ता
ज्याचीजशी परिभाषा
उंचावते महत्वकांक्षा
विजयश्रीची जिगीषा
डावपेच कामास येती
वृद्धींगत होई चिकीर्षा
सवय झाली युध्दाची
तय्यार सैनिक संघर्षा
आंदोलनाने जागवली
संकल्पित प्राप्ती ईर्षा

**- हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६...**

**बेभरवशी कांदा ..**

लाल पांढरा दोन्ही
सारखा लबाड कांदा
दलालांना देई घबाड
आडत्या सोईचाधंदा
योग्यता नसता मागे
योग्य भावाचा वादा
कसे कळेना रे भावा
सारे लावे तुला नादा
रस्त्यावर फेके कधी
चिडून कृषकएखादा
लागवड खर्च निघेना
वाहतूकी वाया खुर्दा
निर्यातकरण्यासाठी
गाडीत भरला कांदा
घेण्या साठी फायदा
वेळी बदलावा सांधा
भल्या रडवतो कांदा
बनतो फाशीचाफंदा
खुर्चीमिळत आसता
हो स्वप्नांचा चेंदामेंदा
कटाळून विक्रीकरता
नवीन येणार आपदा
भाव भिडे गगनाला
तिसरे जमवी संपदा
किती मिरवतो तोरा
नाशवंत असून सुद्धा
कधी तू गुडूप होऊन
सोन्याची करी स्पर्धा
बदल न होई प्रवृत्तीत
कुणी वंदा कुणी निंदा
विकला गेलास बेभाव
कशास झालास मिंधा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894